# छत्रपती राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**डॉ. विलास सदाफळ,** राज्यशास्त्र विभागप्रमुख श्रीपतराव कदम महाविद्यालय, शिरवळ

---

**प्रस्तावनाः**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या सामाजिक-राजकीयदृष्टया सार्वजनिक कार्याची सुरूवात राजर्षी शाहू महाराजांच्या विलक्षण प्रोत्साहनाने झाली, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले आहे. बाबासाहेबांच्या नेतृत्वाच्या सुरूवातीच्या काळातील जडणघडणीला मोठया प्रमाणात शाहू महाराज कारणीभूत ठरले आहेत हे यातून स्पष्ट होते. 1916 साली डॉ. आंबेडकरांनी कोलंबिया विद्यापीठातून पीएच.डी. संपादन केली आणि एम.एस.सी. व बॅरिस्टरीच्या अभ्यासाक्रमासाठी पुढे त्यांनी 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स' या संस्थेत प्रवेष घेतला. परंतु बडोदे संस्थानाने दिलेल्या स्कॉलरशीपची मुदत संपल्याने त्यांना ते शिक्षण अर्धवट टाकून ऑगस्ट 1917 मध्ये भारतात परत यावे लागले. त्यानंतर त्यांनी बडोद्याला संस्थानाच्या अटीप्रमाणे नोकरी करण्याचा प्रयत्न केला. तेथील अस्पृश्यातेच्या अपमानकारक वागणुकीमुळे अखेर त्यांनी नोकरी सोडली. बाबासाहेबांनी राजर्षी शाहू महाराजांनी मैत्री केली, त्यामागे शाहू महाराजांचे ध्येयनिष्ठ समाजक्रांतीकारी कार्य होते हे लक्षात घेतले पाहिजे. 1919 च्या दरम्यान शाहू महाराजांच्या कार्याबद्दल डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना माहिती होती. शाहू आणि आंबेडकर यांना जोडणारा दुवा फुले प्रभावाचा होता. राजर्षी शाहू महाराजांच्या कार्यावरही फुले विचाराचा प्रभाव होता. जरी शाहू महाराजांनी स्वतःला सत्यशोधक म्हणून घेण्यास नकार दिला आणि उघडपणे आर्य समाजाचा म्हणवून घेतले असले तरी शाहू महाराजांच्या अनेक अंगी कार्यावरील फुले व सत्यशोधक चळवळीचा प्रभाव वेगवेगळया प्रकारे उलघडून दाखविता येवू शकतो.

जानेवरी 1919 मध्ये डॉ.बाबासाहेबांनी टाईम्स ऑफ इंडियाच्या एका अंकात 'एक महार' या टोपन नावाने पत्रात्मक लेख लिहून स्वतंत्र दलित अस्मितेचा राजकीय स्वरूपाचा पुरस्कार केला. त्या पत्रात त्याने लिहिले होते की, स्वराज्य हा जसा ब्राम्हणांचा जन्मसिध्द हक्क आहे. तसाच तो महारांचाही आहे. ही गोष्ट कोणीही मान्य करेल. म्हणून पुढालेल्या वर्गांनी दलितांना षिक्षण देवून त्यांच्या मनाची आणि समाजाची सामाजिक दर्जाची उंची वाढविणे हे त्यांचे आद्यकर्तव्य आहे. हे जोपर्यंत होणार नाही तोपर्यंत भारताच्या स्वराज्याचा दीन बराच दूर राहणार आहे हे निश्चित आहे. या पत्रातील भूमिकेचे पडसाद शाहू महाराजांच्या संवेदनषील मनावर पडले. तथापि शाहू महाराजांनी जरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी टोपन नाव धारण करून हे पत्र लिहले असले तरी, त्याचा शोध लावला. सन 1918-19 च्या दरम्यान डॉ.बाबासाहेब यांचे नाव माहित झाले होते त्यावेळी डॉ.बाबासाहेब सार्वजनिकरित्या सामाजिक कार्यात आले नव्हते. शाहू महाराजांचे निष्ठावान सहकारी दत्तोबा पवार यांची सिताराम शीवतरकर यांच्यामार्फत 1918 च्या दरम्यान बाबासाहेबांशी शाहू महाराजांचा परिचय घडून आला. कोल्हापूर संस्थानात शाहू महाराजांच्या प्रेरणेने अस्पृश्योध्दाराच्या चळवळीतील ते प्रमुख नेते होते. पुढे शाहू महाराज आणि आंबेडकर या उभयतांची भेट 17 डिसेंबर 1919 मध्ये परळच्या बीआयटी चाळीत बाबासाहेबांच्या घरी झाली. राजेशाही थाटात वाढलेल्या महाराजांनी बाबासाहेबांना प्रेमाची मिठी मारली होती. यानंतर शाहू आंबेडकर यांच्या कौटुंबिक जिव्हाळयाचे नाते वृध्दींगत झाले.

राजर्षी शाहू महाराजांनी डॉ. आंबेडकरांना राष्ट्रीय स्तरावरील दलितांचा किंबहूना दलितांचा नेता म्हणून प्रस्तापित करण्याचा प्रकल्प त्यांच्या भेटीतून आखला असल्याची शक्यता दिसत होती. माणगाव परिषदेच्या निमित्ताने जो ब्राम्हण आणि ब्राम्हणेत्तर यांच्यात संघर्ष झाला होता. त्यात ही परिषद ब्राम्हणीय दहशतवादापासून हा धोका ओळखून माणगाव ऐवजी कोल्हापूर नगरीतच शाहू महाराजांनी भव्य परिषद घेण्याचे टाळले असावे असे इतिहासकारांचे मत आहे. त्यांच्या या मताला निश्चित आधार आहे. या धोक्याच्या संघर्ष काळात महाराजांनी संस्थांच्या मध्यवर्ती ठिकाणी अर्थात कोल्हापूर येथे कोणत्याही प्रकारच्या सामाजिक चळवळीच्या सभा, परिषदा घेण्याचे सातत्याने टाळले आहे. त्यांनी संस्थानाबाहेरील विविध सभा, परिषदा यांचे नेतृत्व केले आहे. राजर्षी शाहूंनी या संघर्षात कुठेही माघार घेतली नाही. त्यांच्याच पुढाकाराने कोल्हापूरपासून काही अंतरावर दूर असलेल्या कागल जहागीरीतील माणगाव येथे ही परिषद संपन्न झाली. या परिषदेतूनच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नेतृत्व समाजापुढे आले.

राजर्षी शाहू प्रणित समाज परिवर्तक चळवळीने 19 व्या शतकाच्या पहिल्या दशकात सामाजिक, राजकीय अभियानाची प्रक्रिया गतीमान केली होती. माणगावची परिषद जर दलितांच्या अस्पृश्याच्या मुक्ती लढयाचा आंबेडकरी प्रारंभ असेल तर या परिषेच्या कोल्हापूर संस्थानामधील आयोजनाला ब्राम्हणेत्तर चळवळीच्या राजकीय संघटनेच्या प्रक्रियेतील एक व्यूहनीती असलेली घटना म्हणून पाहिले जाते. ब्राम्हणेत्तरांना ब्राम्हणी नेतृत्वाविरोधी दलित चळवळीषी

सहकार्य करण्याची सांधेजोड करणे आवश्यक होते. सामाजिकदृष्टया अस्पृष्यांच्या मुक्ती प्रश्नाच्या सोडवणूकीकरीता ब्राम्हणेत्तर चळवळीचे नेते, कार्यकर्ते फारसे अनुकूल नव्हते हेही दिसून येते. तसेच राजर्षी शाहूंना दलित मुक्तीचा प्रश्न अग्रक्रमाचा वाटत होता. त्यांनी अस्पृश्य निवारणाच्या कार्यक्रमात ब्राम्हणेत्तर नेते कार्यकर्त्यांना उतरण्यास प्रवृत्त केले. शाहू महाराजांच्या कार्याचा विश्वास वाटल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर माणगावच्या परिषदेत सहभागी झाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे परिषदेचे अध्यक्ष होते तर राजर्षी शाहू महाराज हे प्रमुख अतिथी होते. सभा सुरू असताना शाहू महाराज आले ते शिकारीच्या ड्रेसमध्ये होते. कदाचित सनातनी विचारकांना चकवण्यासाठी शाहू महाराज थेट माणगावच्या परिषदेत आले नाही ते शिकारीसाठी तामगाव पार्क येथे गेले आणि तेथून परस्पर परिषदेच्या मंडपात हजर झाले. परिषदेला शाहू महाराज येणार अशी वार्ता सर्वत्र पसरली होती. मात्र अस्पृश्याच्या परिषदेला ते येणार नाही अशाही चर्चा सर्वत्र रंगल्या होत्या. जे प्रत्यक्ष सहभागी झाले त्यांच्या म्हणण्यानूसार हे खरेही होते. ते असेही म्हणाले की शाहू महाराजांचे भाषण छापील होते. ते सुरूवातील त्यांनी वाचून दाखविले व उर्वरीत भाग भास्करराव जाधवांनी वाचून दाखविला. त्यांचे भाषण संपल्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर भाषण करावयास उठले, त्यांचे भाषण सुरू असतानाच शाहू महाराज निघून गेले. शाहू महाराजांचे भाषण हे विशेषकरून फार द्रष्टेपणाचे होते. या भाषणात त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच तुमचे खरे पुढारी आहेत, ते तुमचाच नव्हे तर तुम्हा, आंम्हा सर्वांचाच उध्दार करतील अशाप्रकारचे त्यांच्या अंगी गुण आहेत. असे भाषणाच्या पहिल्यांदाच शाहू महाराजांनी उद्घोषित केले होते. अजून बाबासाहेबांच्या कार्याची सुरूवात व्हायची होती. अशा प्रसंगात शाहू महाराजांनी हे भाकीत वक्तव्य केलेले दिसते. ते पुढे भविष्यकाळात खरे ठरलेलेही दिसून येते.

राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या भाषणात बाबासाहेबांबद्दल जे उद्गार व्यक्त केले. तो सर्वचा सर्व मजकूर व तपशील मुकनायकाच्या वृत्तात आलेला दिसत नाही. शाहू महाराजांचे हे भाषण स्वतः डॉ. आंबेडकरांनी स्वतः संपादित केले असावे. या वृत्तांतात अनेक वाक्ये काढली आहेत. त्यावेळी बाबासाहेब सरकारी नोकरीत होते, सरकारी प्रतिकूलता, दलित चळवळ, स्वतंत्र नेतृत्व यादृष्टीने ओढवू नये अशा मुस्तेदीगिरीतून हे संपादन केलेले असावे. शाहू महाराज भाषण करताना असे म्हणतात की, आज माझे प्रिय मित्र आंबेडकर यांनी या सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारले. त्यांच्या भाषणाचा लाभ मला मिळावा म्हणून मी शिकारीतून बुध्या येथे आलो आहे. आंबेडकर हे मुकनायक पत्र काढतात व सर्व मागासलेल्या जातींचा परामर्श घेतात. त्याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. हे भाषणाचे सुरूवातीचे वाक्य मुकनायकाच्या अंकात संपादित करून वगळले आहे. मुकनायक हे पत्र बाबासाहेब स्वतः नामोल्लेख करून चालवू शकत नव्हते. सरकारी नोकरीमुळे त्यांनी मुकनायकामध्ये त्यांनी स्वतःचे नाव वगळले होते. त्यावेळेस मुकनायकाचे संपादक भटकर हे होते. परंतु खरे संपादक बाबासाहेबच होते. भाषणामध्ये शाहू महाराजांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विद्वत्तेची प्रसंशा करताना त्यांना पंडित या पदवीने सन्मानीत केले आहे. त्याकाळात पंडित ही पदवी ब्राम्हण विदवानांना दिली जात होती. हा ब्राम्हण व्यवस्थेचा ज्ञान निर्देषक, ज्ञान बंदी नियंत्रक स्वरूपाचा दंडक होता. तो नाकारण्याच्या उद्देषाने शाहू महाराजांनी डॉ. आंबेडकरांना जाहीर भाषणात पंडित असे संबोधले होते. त्याच बरोबर त्यांच्या स्वतंत्र नेतृत्वाच्या भूमिकेचे प्रंषसनीय समर्थन करीत शाहू महाराजांनी त्यांच्या नेतृत्वाविषयी जे भाकित केले आहे. त्याचा उल्लेख मुकनायकाच्या वृत्तांतातून वगळला होतो. परंतु एप्रिल 1933 च्या जनताच्या खास अंकात पुढे या भाकितपर विधानाला प्रसिध्दी दिली आहे. या परिषदेतील शाहू महाराजांचे भाषण अनेक संदर्भांनी महत्वपूर्ण होते.

अस्पृष्यांच्या शोषणमुक्ती संबंधी त्यांनी काही अत्यंत कळीच्या मुद्यावर त्यांचे चिंतन मांडले होते. जातीव्यवस्थेवर आधारलेल्या खेडेगावात गाववतनदार, गावपाटील, कुलकर्णी हा सत्ताधारी स्तर अस्पृष्यांचे शोषण करून त्यांची गुलामगिरी टिकवून ठेवतो याची स्पष्ट अचूक जाण शाहू महाराजांना असल्याने त्यांनी बलुतेदारी पध्दत, वेठबिगरी, अस्पृश्य व गुन्हेगार मानलेल्या जातींची हजेरी पध्दत, सार्वजनिक क्षेत्रात पाळली जाणारी अस्पृश्यता, सामाजिक जातिव्यवस्थेतील पारंपारिक नियम व रिवाज हे नष्ट होण्यासाठी वेगवेगळे जातीमुक्तीचे कायदे करून नवनवीन सामाजिक कल्याणाच्या योजना आपल्या संस्थानात लागू केल्या. 1918 साली शाहू महाराजांनी महार वतन नष्ट करण्याचा कायदेषीर आदेश जाहीर केला होता. महार वतनातील वेटबीगारीचे पारंपारिका श्रम महार जातीयांची जातीय गुलामगिरी सातत्यपूर्णतेने टिकवून ठेवते. याच अचूक भान शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना होते. ब्रिटीशानी महार वतनाच्या सोईनुसार वापर करून महाराजांवर पारंपारिक जाती नियमाप्रमाणे सरकारी कामे करण्याची सक्ती केली होती. मात्र या कामाचा रोख पगार देण्याऐवजी गावातील परंपरागत बलुत्यांच्या पध्दतीतून तयारीचे जे काही मोबदल्यात मिळेल ते स्वीकारण्याचे लादले. शाहू महाराजांनी महार वतनाचे रूपांतर करण्याचा कार्यक्रम दिला होता. तो त्यांनी संस्थानात धडाडीने राबविताना करवीरच्या महाराणी यासाठी पुढाकार घेतल्याचेही आपल्या भाषणात बोलून दाखविले आहे. डॉ. आंबेडकर या कार्यात त्यांची नक्कीच मदत करतील

असेही त्या भाषणात शाहू महाराज म्हणतात. पुढे डॉ. आंबेडकरांनी दलित मुक्तीच्या लढयाच्या कार्यक्रम पत्रिकेवर महार वतन बरखास्तीची लढाई केलेली आपल्याला दिसते. तिस-या दषकात महार वतनाची गुलामगिरी मोडीत काढणा-या आंबेडकरांच्या या भाषणाचा सार मुकनायकामध्ये दिलेला आहे.

शाहू महाराज त्यांच्या संस्थानाच्या सत्तेचा उपयोग मुक्तीदायी समाज कारणासाठी करत आहेत. त्यांना सामाजिक कल्याणाचे आणि जातिमुक्त नवसमाज रचनेच्या ध्येयाचे एक मॉडेल संस्थानात केलेल्या कार्यातून भारतापुढे ठेवायचे होते. तथापि ते केवळ त्यांच्या संस्थानापुरते नेतृत्व करणारे नव्हते. त्यांचे नेतृत्व हेच अखिल भारतीय स्वरूपाचे होते. दलित शोषितांच्या मुक्तीसाठी ते कळवळयाने आणि जिव्हाळयाने झटत होते. तरीही त्यांनी माणगावच्या परिषदेत प्रांजळपणे स्वतःला दायिचे नेतृत्व म्हणवून डॉ. आंबेडकरांना आईचे नेतृत्व म्हणून संबोधले. शाहू महाराजांच्या जाती भूमिकेचा परिणाम हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर झाला होता.

अशा प्रकारे कोल्हापूर संस्थानातील कागल जहागिरीतील माणगाव येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या उभयतांच्या पुढाकाराने घडवून आणलेल्या माणगाव परिषदेमध्ये करवीर संस्थान आणि त्याच्या लगतच्या असंख्या इलाख्यांमध्ये अस्पृश्य बांधवांमध्ये कमालीचे परिवर्तन घडून आलेले दिसते. तत्कालीन मनूवादी आणि त्या अनुषंगाने सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय अवर्षनाला बळी पडलेल्या या बहिस्कृत वर्गात कमालीची जागृती आली होती हे यावरून दिसून येते. दीनदुबळयांच्या सुख दःखात कायम खपणारा, संकटसमयी त्यांच्या पाठीमागे मेढ बनून उभा राहणारा, लढण्यास बळ पुरविणाऱ्या एखाद्या देवतेसमान शाहू महाराज या दीनदुबळयांना वाटत असे. त्यांचे या पध्दतीचे विलक्षण व्यक्तिमत्व माणगाव परिषदेतून पुढे आलेले आपल्याला दिसते. डॉ. आंबेडकर या नावाच्या सामान्य प्राध्यापकाला अस्पृष्य बांधवासमोर एक छत्रपती संस्थानिकासोबत बसायला मिळाल्यामुळे आंबेडकरांमध्ये एक नवचैतन्य निर्माण झाले असेल असे यावरून दिसते. डॉ. आंबेडकर यांसारख्या अगदी नवख्याच तरूणाला तसेच अस्पृष्य ठरविलेल्या महार तरूणाला करवीर संस्थान नरेष राजर्षी छत्रपती शाहू महाराज त्यांच्या परळ येथील मुकनायक कार्यालयाच्या ऑफिसमध्ये जावून प्रत्यक्ष भेटतात आणि मदत करतात तसेच आंबेडकरांची कोल्हापूर संस्थानात स्वतः सारथी होवून मिरवणूक काढतात. यावरून डॉ. आंबेडकर आणि शाहू महाराज यांचे सामाजिक सख्य दिसून येते.

**संदर्भः**


1. कीर धनंजय, डॉ. भीमराव रामजी आंबेडर, खंड दुसरा, सुगावा प्रकाषन, पुणे, 1978
2. आंबेडकर बाबासाहेब, मून वसंत (संपा.), बाबासाहेब आंबेडकरांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक, शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, 1990
3. खैरमोडे, चां.भ., डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, खंड दुसरा, सुगावा प्रकाषन, पुणे, 1991
4. कीर धनंजय, राजर्षी शाहू छत्रपती, पॉप्युलर प्रकाषन, मुंबई, 1979
5. डॉ. पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, 2007
6. ढावरे, प्रा. रमेष (संपा.), माणगाव परिषद 61 वा स्मृति महोत्सव विषेषांक, 1982
7. सूर्यवंषी कृ.गो., राजर्षी शाहू: राजा व माणूस, ठोकळ प्रकाषन, पुणे, 1984
8. Sangave Vilas (ed), Rajarshi Shahu Chhatrapati papers –vol-IX, (1920-1936) Shahu Researcah Centre, Shivaji University, Kolhapur, 2005